# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/३०६/२०१०/३३

तक्रार दाखल दिनांक :- ०६/१०/२०१०
निकाल दिनांक :- २४/११/२०१०

श्री अब्दुल अजीज अब्दुल गफार,
घर नंबर १०५, सादातनगर,
गल्ली क्रमांक ९३, पैठण रोड,
औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११६६९४२२) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर मंडल औरंगाबाद
गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | प्रदीप. अ. सगणे | अध्यक्ष / सदस्य सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०६/१०/२०१० रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २०/१०/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याचा ग्राहक क्रमांक ४९००११६६९४२२ असा आहे. ग्राहकास माहे जुन २०१० पर्यंत मीटर रिडींगनुसार देण्यात आलेले वीज देयक त्यांने नियमीतपणे भरलेले आहे. माहे जुलै २०१० मध्ये ग्राहकास

मागील रिडींग २१४७ व चालु रिडींग ३२८९ दाखवुन ११४२ युनिटचे रुपये ९८५४.४२/- रक्कमेचे महीण्याचे वीज देयक देण्यात आले. वर दाखविलेले चालु रिडींग चुकीचे असल्याबाबत ग्राहकाने महावितरण च्या संबंधित कार्यालयात जावुन तक्रार केली व मीटर रिडींग नुसार सुधारीत वीज बिल देण्याबाबत विनंती केली परंतु महावितरण कंपनीने त्याचे मीटरची तपासणी न करता पुढील माहे ऑगस्ट व सप्टेबर २०१० या महीण्याकरीता सरासरी आकारणीची वीज देयक ग्राहकास दिली. ग्राहकाने चुकीच्या वीज बिलाचा भरणा केला नाही व वीज पुरवठा बंद करण्याची तोंडी सुचना कंपनीने दिल्यामुळे त्यांनी या मंचात तक्रार दाखल केली.ग्राहकाने त्याचे मीटर तपासुन रिडींगनुसार सुधारीत वीज देयक देण्याबाबत व व्याज व दंडाची रक्कम माफ करण्याबाबत मंचास विनंती केली.

२) वरील तक्रारीची सुनावणी दिनांक २०/१०/२०१० रोजी घेण्यात आली. सुनावणीस नोडल अधिकारी श्री भारती, श्री पी.आर. येनगे सहाय्यक अभियंता व वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचे सी.पी.एल. सादर करुन स्थळ निरिक्षण अहवालानुसार सुधारीत वीज बिल देण्याबाबत मुद्दत देण्यात यावी अशी विनंती मंचास केली. मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकाचा स्थळ निरिक्षण अहवाल व वीज देयक दुरुस्ती अहवाल दिनांक २६/१०/२०१० पर्यत सादर करण्याचे सांगुन प्रकरण निकालासाठी ठेवले.

३) दोन्ही बाजुकडुन दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकाचा माहे जुन २०१० पर्यंत वीज बिलाबाबत कोणताही वाद नव्हता. माहे जुलै २०१० मध्ये ग्राहकाचे मागील रिडींग २१४७ व चालु रिडींग ३२८९ दाखवुन ११४२ युनिटचे चुकीचे व अवास्तव रक्कमेचे वीज बिल देण्यात आले.तसेच माहे ऑगस्ट व सप्टेबर २०१० या महीण्यात मीटर रिडींग न घेता सरासरी ३१८ युनिटची आकारणी करुन वीज देयक देण्यात आल्याचे सी.पी.एल. वरुन दिसुन येत आहे. नोडल अधिकारी यांनी दिनांक २४/१०/२०१० रोजी घेतलेल्या स्थळ निरिक्षण अहवालानुसार ग्राहकाचे मीटर रिडींग २४२७ युनिट असल्याचे नोंद केली आहे तसेच ग्राहक ३२० व्हॅट वीज भार वापरत असल्याचे अढळुन आले. त्यामुळे त्यांनी चुकीचे झालेले माहे जुलै २०१० चे वीज देयक दुरुस्त करुन रुपये १११३९.३९/- क्रेडीट दर्शविणारा प्रस्ताव सादर केला. परंतु स्थळ निरिक्षण अहवाला नुसार ग्राहकाचे दिनांक २४/१०/२०१० रोजी मीटर वाचन २४२७ युनिट असल्यामुळे माहे आक्टोबर २०१० पर्यंत वरील मीटर रिर्डीगनुसार वीज बिल दुरुस्त करणे योग्य होईल.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकास माहे जुलै ते ऑक्टोबर २०१० मध्ये दिलेले सर्व वीज देयक रद्द करण्यात येत असुन त्याऐवजी वरील कालावधीकरीता स्थळ निरिक्षण अहवाला प्रमाणे २८० युनिटची सम प्रमाणात आकारणी करुन सुधारीत वीज बिल देण्यात यावे.

२) वरील सुधारीत वीज बिलात कोणतीही व्याज व दंडाची आकारणी करु नये.

**वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.**

**प्र. अ. सगणे**
**सदस्य/सचिव**

**विलासचंद्र सु. काबरा**
**सदस्य**